# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

२०/७/२३
१२:३०

दिनांक : १९/०७/२०२३

### प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत नदीकाठी पूर सदृश्य परिस्थितीने बाधित ठिकाणी महानगरपालिकेची तात्काळ मदत, ९ लोकांचे जीव वाचवले. उल्हासनगर शहरामध्ये व लगतच्या भागात मुसळधार पास पडत आहे. हवामान खात्यान ठाणे जिल्हयासाठी ऑरेंज अॅलर्ट घोषित केला आहे.

या सतत पडणा-या मुसळधार पावसामुळे नदी व नाले पर पातळी ओलांडून वाहत असल्याने नदी व नाल्यालगतच्या काही भागामध्ये घरांमध्ये व दुकानात पाणी शिरले आहे.अचानक ढलेल्या पाण्यामुळे सावित्रीबाई फुले नगर मध्ये ९ लोक पाण्यात अडकून पडले होते अग्निशमन विभागाने तडीने धाव घेत या ९ लोकांना पाण्याबाहेर सुखरूप काढले. अग्निशमन विभाग वेळेत पोहोचला नसता तर पाण्यात बुडून दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे अग्निशमन विभागाचे बाळू नेटके व त्यांच्या सहकाऱ्यांचे या तत्पर कामामुळे कौतुक करण्यात येत आहे.

शहरात सखलभागांची तातडीने पाहणी करून महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग अधिकारी व आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन अधिकाऱ्यांची पथके या ठिकाणी पाठवून नागरिकांचे स्थलांतर महानगरपालिकेच्या व काही खाजगी शाळांमध्ये करण्यात आले. आज दुपारी समुद्राला भरती असल्याने पाणी पातळी वाढत होती यामुळे अनेक नदीकाठची घरे रिकामी करून या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. त्याची माहिती खालील प्रमाणे.

**प्रभाग समिती:-**

**१) प्रभाग समिती १ - २००**
**२) प्रभाग समिती २ - २५०**
**३) प्रभाग समिती ३ - २५०**
**४) प्रभाग समिती ४ - २५०**

**वरील एकूण अंदाजे - ९५०**लोकांच्या घरात पाणी शिरल्याचे आढळून आले. शहरातील खालील ठिकाणी पूरग्रस्त परिस्थिती आढळून आली. ठिकाण:- शांतीनगर बालधुनी नाला, सम्राट अशोकनगर, मीनाताई ठाकरे नगर, करोतीया नगर, भरत नगर, आम्रपाली विदयालय, या सर्व पुरग्रस्त भागांची पहाणी करुन नागरिकांना महापालिकेच्या तात्पुरत्या निवारा केंद्रामध्ये हलविण्यात आले आहे. आयुक्त अजिज शेख व अतिरिक्त आयुक्त करुणा जुईकर व जमीर लेंगरेकर, उप आयुक्त अशोक नाईकवडे व सुभाष जाधव सार्वजनिक आरोग्य अधिकारी मनीष हिवरे स्वच्छता निरीक्षक एकनाथ पवार व विनोद केणे तसेच प्रभाग अधिकारी गणेश शिंपी दत्तात्रय जाधव, जेठानंद, अनिल खतुरानी, अग्निशमन विभागाचे बाळू नेटके व कर्मचारी, यांनी वरील पूरग्रस्त ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी दिल्या.

लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येवून लोकांची जेवनाची व राहण्याची व्यवस्था करण्यात आली. मा.डॉ. श्रीकांत शिंदे,जिल्हाधिकारी, आमदार परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. तसेच विविध पक्षांचे स्थानिक नेते व कार्यकर्ते नागरिक स्वयंसेवक यांनी प्रशासनास व नागरिकास अतिशय तन्मयतेने मदत केली.

मा. आयुक्त अजिज शेख, अतिरिक्त आयुक्त सर्व उप आयुक्त यांनी पुरग्रस्त भागाची पहाणी केली व तेथील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करण्याबाबत आयुक्त अजिज शेख यांनी सूचना दिल्या. मा. आयुक्त यांनी सर्व अधिकारी यांना सध्याच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याबाबत सर्व सबंधित अधिकारी व यांनी कार्यालयात पूर्ण वेळ उपस्थित रहाणेबाबत सूचित केले.आयुक्त अजिज शेख यांनी नागरिकांना पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सतर्क राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षास किंवा प्रभागातील आपत्ती व्यवस्थापन कक्षास दिलेल्या संपर्क क्रमांक वर तात्काळ संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

१९/७/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम अॅनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.